महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(२)(३)/२०२२/तेवीस दिनांक :- ०१ ऑगस्ट, २०२४

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

**विषय :-** महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट- ब मुख्य परीक्षा - २०२२ पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ :-** जाहिरात क्रमांक ०३६/२०२३

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट- ब मुख्य परीक्षा – २०२२ या परीक्षेतील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरिता तृतीयपंथी व्यक्तीसाठी एक पद आरक्षित ठेवण्यासंदर्भात मा. मॅट यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने आयोगाकडून मा. उच्च न्यायालयात रिट याचिका (स्टॅ.) क्रमांक २१२१०/२०२४ दाखल करण्यात आली आहे. त्यावरील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन एक इ.मा.व. व एक अमागास वर्गातील अशा दोन पदांचा निकाल राखून ठेवण्यात येत आहे. तसेच मूळ अर्ज क्रमांक ६०७/२०२४ प्रकरणी मा. मॅट, छत्रपती संभाजीनगर यांच्या आदेशावर करावयाच्या कार्यवाहीचा विचार करुन आ.दु.घ. (खेळाडू) व अमागास (खेळाडू) प्रवर्गातील प्रत्येकी एक अशी दोन पदांचा निकाल राखून ठेवण्यात येत आहे. उपरोक्त प्रमाणे एकूण ४ पदे राखून ठेवून उर्वरित ५९९ पदांसाठी सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. सदर सर्वसाधारण गुणवत्ता यादी उमेदवारांच्या अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने तयार करण्यात आली असून अंतिम निकालापूर्वी पडताळणीअंती काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये/ शिफारशीमध्ये बदल होऊ शकतो.

३. खेळाडू व अनाथ प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची प्रमाणपत्रे प्राधिकृत अधिका-यांकडून पडताळणीच्या अधीन राहून त्यांचा खेळाडू/अनाथ प्रवर्गाचा दावा तात्पुरता ग्राह्य धरण्यात आला आहे व त्यांचा सर्वसाधारण गुणवत्ता यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

४. प्रस्तुत सर्वसाधारण गुणवत्ता यादी मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात येत आहे. न्यायिक प्रकरणावरील आदेशामुळे सदर सर्वसाधारण गुणवत्ता यादीत बदल संभवतो.

५. खेळाडू व अनाथ प्रवर्गातील उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर प्रस्तुत संवर्गाची तात्पुरती निवडयादी व प्रस्तुत परीक्षेच्या भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प उपलब्ध करुन देण्यात येईल.

६. अर्जाद्वारे उमेदवारांकडून करण्यात आलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने तपासणी झाल्यानंतर तसेच उमेदवारांकडून प्राप्त भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय (Opting Out), आरक्षण इत्यादी बाबी लक्षात घेवून अंतिम गुणवत्ता यादी आधारे संबंधित उमेदवारांच्या विषयांकित संवर्गासाठी शिफारशी करण्यात येतील.

उप सचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,नवी मुंबई.

ठिकाण : नवी मुंबई.